महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५१ वे | दिनांक : २५/०५/२०२६ | वार : सोमवार

## पालिकेतील गोंधळावर उदयनराजे-शिवेंद्रराजे संतप्त; नगरसेवकांना दिला इशारा



**सातारा** : सातारा नगरपालिकेतील दोन्ही राजेंच्या गटांमधील नगरसेवकांमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत वादाची गंभीर दखल घेत, आज खासदार उदयनराजे भोसले आणि मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत दोन्ही राजेंनी आपापल्या नगरसेवकांची चांगलीच कानउघाडणी केली असून, बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना खासदार उदयनराजे भोसले यांनी पालिकेच्या कामकाजात यापुढे कोणताही सावळागोंधळ खपवून घेतला जाणार नाही, असा सज्जड इशारा दिला आहे.

खासदार उदयनराजे भोसले आणि मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत नगरसेवकांमध्ये योग्य समन्वय साधण्यावर भर देण्यात आला असून, शहरातील विविध वॉर्डासह हद्दवाढीत समाविष्ट झालेल्या नवीन भागांतील विकासकामे कशी मार्गी लावता येतील, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय, पहिल्यांदाच निवडून आलेल्या आणि प्रशासकीय कामांचा अनुभव नसलेल्या नव्या नगरसेवकांना पालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना खासदार उदयनराजे यांनी दिल्या. तर या महत्त्वपूर्ण बैठकीच्या निमित्ताने खासदार उदयनराजे आणि मंत्री शिवेंद्रराजे हे दोन्ही राजे पुन्हा एकदा एकत्र आल्याचे पाहायला मिळाले.

साताऱ्यातील छत्रपती शाहू स्टेडियमवर दोन दिवसांपूर्वी राजकारण आणि क्रिकेटचा अनोखा थरार पाहायला मिळाला. निमित्त होते, दणक्यात सुरू झालेल्या मंत्री शिवेंद्रराजे भोसले क्रिकेट चषकाचे. या स्पर्धेच्या वेळी स्वतः मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी हातात बॅट घेत चौकार-षटकारांची जोरदार आतषबाजी केली. मात्र, मैदानात अशी फटकेबाजी करत असतानाच त्यांनी आपल्या खास राजकीय शैलीत नगरसेवकांना कानपिचक्याही दिल्या.

यावेळी बोलताना शिवेंद्रराजे म्हणाले की, खासदार उदयनराजे आणि मी अंपायर आहोत... त्यामुळे कोण कच्चा लिंबू आहे, कोण आऊट आणि कोण नॉट आऊट, हे आम्हीच ठरवतो. त्यांच्या या मिश्किल वक्तव्याने उपस्थितांमध्ये एकच हशा पिकवला. तसेच, सातारा नगरपालिकेच्या नगरसेवकांच्याही स्वतंत्र टीम तयार करून त्यांच्या क्रिकेट मॅचेस आयोजित कराव्यात, अशी मजेशीर सूचनाही त्यांनी यावेळी केली.

काही दिवसांपूर्वी सातारा नगरपालिकेच्या सभेत मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे समर्थक बाळासाहेब खंदारे यांनी खासदार उदयनराजे भोसले यांचे समर्थक असलेले उपनगराध्यक्ष दत्तात्रय बनकर यांच्यावर टीका केल्याने नवा वाद निर्माण झाला होता. या वादानंतर दोन्ही गटांच्या नगरसेवकांच्या अनुक्रमे जलमंदिर आणि सुरुची येथे स्वतंत्र बैठका पार पडल्या.

परंतु आता नगरविकास आघाडी आणि सातारा विकास आघाडी असा कोणताही गटभेद उरला नसून सर्वजण भाजपचेच नगरसेवक आहेत, अशी स्पष्ट समज दोन्ही नेत्यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना दिली. या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुंबईत दोन्ही राजेंची एकमेकांशी भेट झाली आणि त्याच भेटीनंतर आज साताऱ्यात सर्व नगरसेवकांची ही महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक पार पडली.




## परकीय प्रभावाच्या धोक्याचा इशारा; प्रकाश आंबेडकरांची मोदींवर टीका



वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या तालावर नाचत असल्याची टीका केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे कृषी क्षेत्र गंभीर संकटात सापडले असताना भारतीय शेतकऱ्यांचा बळी दिला आहे. त्यांच्या भूमिकेमुळे भारतीय शेती व लक्षावधी शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर दूरगामी व विनाशकारी परिणाम होणार आहेत, असे ते म्हणालेत.

प्रकाश आंबेडकर गत काही महिन्यांपासून सातत्याने केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणांवर निशाणा साधत आहेत. त्यांनी नुकतीच पंतप्रधान मोदींच्या इटली दौऱ्यावर टीका केली होती. त्यानंतर आता त्यांनी भारत - अमेरिकेतील व्यापार करारावर निशाणा साधला आहे. या प्रकरणी त्यांनी थेट मोदींवर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या तालावर नाचण्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, मोदी पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या तालावर नाचत आहेत. मोदी यांनी भारतीय बाजारपेठेत अमेरिकन कृषी उत्पादनांना प्रवेश देण्यास संमती दिली आहे. त्याचे भारतीय शेतीवर आणि लक्षावधी शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर दूरगामी व विनाशकारी परिणाम होणार आहेत.

आपले शेतकरी आधीच वाढता उत्पादन खर्च, किमान आधारभूत किमतीचा (MSP) अपुरा मोबदला आणि घटलेली निर्यात या समस्यांशी झुंज देत आहेत. या स्थितीत ते प्रचंड अनुदान मिळणाऱ्या अमेरिकन कृषी उद्योगाशी स्पर्धा करतील हे वाटत नाही. महाराष्ट्रात, गेल्या एका दशकात कर्जबाजारीपणा, दुष्काळ, वाढता खर्च आणि अनिश्चितता यामुळे ३७,००० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अगदी अलीकडेच, इंधन संकटाने राज्यातील शेतकऱ्यांना हतबल करून सोडले आहे. डिझेलच्या तुटवड्यामुळे शेतीची मशागतीची अत्यंत महत्त्वाची कामे ठप्प झाली आहेत.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी केवळ ५० पैसे प्रति किलोचा भाव दिला जात आहे. यामुळे ते एका पद्धतशीर कर्जचक्रात अडकले आहेत. कारण कांद्याचा उत्पादन खर्च मात्र किमान २२ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचला आहे. अशा गंभीर कृषी संकटाच्या काळातही, मोदी यांनी भारतीय शेतकऱ्यांचा बळी दिला आहे! स्वातंत्र्यापूर्वी, ब्रिटिशांनी शेतकऱ्यांना गुलाम बनवले होते. आज मात्र, मोदी यांनी शेतकऱ्यांचे भविष्य अमेरिकेच्या हाती विकून टाकले आहे. मोदी यांची निष्ठा संशयास्पद बनली आहे. आपले राष्ट्र पुन्हा एकदा एखाद्या परकीय सत्तेचे गुलाम होण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.प्रकाश आंबेडकरांनी सोशल मीडियावरील कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. ते म्हणाले, आज मी अभिजीत दिपके यांच्या वडिलांशी संवाद साधून त्यांच्या कुटुंबाची विचारपूस केली. अभिजीत व त्यांच्या कुटुंबाला जिवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. त्यामुळे त्यांचे कुटुंब प्रचंड मानसिक तणावाखाली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि वैयक्तिक सुरक्षितता हे लोकशाहीचे मूलभूत स्तंभ आहेत. सेन्सॉरशिप आणि जिवे मारण्याच्या धमक्या या मुक्त संवाद आणि लोकशाही चर्चेला कमकुवत करणाऱ्या गोष्टी आहेत.

वंचित बहुजन आघाडी दीपके कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. गरज पडल्यास आमची टीम राजकीय व प्रत्यक्ष पातळीवर त्यांना संरक्षण देईल. प्रस्तुत प्रकरणात सर्वप्रथम देशाच्या सरन्यायाधीशांनी माफी मागितली पाहिजे. त्यांनी केलेले विधान हे त्या याचिकेबद्दल होत हे त्यांनी सांगायला हवे होते, असे ते म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ मे २०२६


## शिवार संसद हे शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणारे प्रभावी व्यासपीठ - डॉ. शिवाजी हुसे



**कन्नड (शिवाजी हुसे) :** शिवार संसद हे शेतकऱ्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करणारे एक प्रभावी माध्यम असून शेतकरी आजपर्यंत केवळ पिकवित आला. आपल्या न्याय हक्काच्या लढाईची त्याला जाणिवच होऊ दिली नाही. देशाचा पाया हा गाव असून गावाचा पाया शिवार आहे. त्यामुळे शिवार जागे झाले तर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील त्यासाठी शेतकऱ्यांनी संघटीत होण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. ( ता. २४ ) शिवार संसदेच्या कार्यक्रमात त्यांनी आपली भूमिका मांडली. सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती व त्रैमासिक तिफण तर्फे मौजे देशगव्हाण येथे शिवार संसद या उपक्रमांतर्गत बैठक प्रगतशील शेतकरी नारायणराव हुसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीच्या जनआंदोलनाचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्याच्या विविध समस्या व सुखना नदी संवर्धन, अवैध्य वाळू उपसा थांबवणे, पाणंद रस्ते, बोगस बियाणांचा प्रश्न, पीक विमा, वण्यप्राण्या पासून पीक संरक्षण, शेतकऱ्यांना दिवसा पूर्णवेळ विज उपलब्ध करून देणे. आरोग्य व अपघात विमा महात्मा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा दहा लाख रुपये करून सर्पदंश , विजेचा शॉक विहिरीतील अपघात यांचा समावेश गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत करावा. सुखना गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर सहा महिन्यात पूर्ण भरून काम सुरू करावे. लघुपात बंधारे तलावातील गाळ काढणे. शेतकऱ्यांना शासकीय योजनेतून मजूर उपलब्ध करून द्या. ग्रामीण युवकांना कृषी स्टार्टअपसाठी पंचवीस लाख रुपये बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे. दुध उत्पादक शेतकऱ्यांना कर्ज सुविधा द्यावी. विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न तातडीने मार्गी लावा. कापूस, तूर, सोयाबीन यांना हमीभाव द्यावा. ग्रामीण भागात शेतमाल प्रक्रिया उद्योग सुरू करावेत. शिवार संसदेस कायदेशीर मान्यता देऊन मंजूर ठरावांना लोकअदालत दर्जा देऊन नव्वद दिवसात अंमलबजावणी चे बंधन करावे. आदी शेतकरी हिताचे विविध ठराव या वेळी एकमताने मंजूर करण्यात आले. सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे यांनी सुखनाच्या कामाचा आढावा घेतला. तसेच शिवार संसदेची भूमिका व आवश्यकता स्पष्ट करून शिवार संसद हे शेतकऱ्यांच्या न्याय हक्काचे व्यासपीठ असून आगामी काळात हे व्यासपीठ अधिक व्यापक करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देऊ असे मत व्यक्त केले. या ठरावाचे निवेदन शासन व प्रशासनास देण्यात येणार आहे. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. या प्रसंगी सरपंच अनंतराव हुसे , बळिराम काळे, अनिल वावरे यांनी मनोगत व्यक्त करून सूचना मांडल्या. या उपक्रमाचे त्यांनी कौतुक करून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी सरपंच अनंतराव हुसे, बळिराम काळे, अनिल वावरे, सोपान कोळकर,शरदराव हुसे, महादेव हुसे, संजय नागरे, मच्छिंद्र डोळे, बाबासाहेब ढाकणे, आसाराम हुसे, रघुनाथ बोंडारे, नितिन हुसे, जगन्नाथ पालवे, प्रल्हादराव हुसे, नारायण पालवे, सुमित चव्हाण, प्रकाश हुसे, भारत कराड, गंगाधर हुसे, महादेव बोंडारे, यांच्यासह अनेक शेतकरी , ग्रामस्थ यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन करून आभार नितीन हुसे यांनी मानले.

## माळीवाडा येथे शेतकऱ्याची आत्महत्या



**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील माळीवाडा येथे एका शेतकऱ्याने शेतात विषारी औषध सेवन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सूर्यकांत विश्वनाथ आस्वार (वय ४६, रा. माळीवाडा ता. जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी फतियाबाद येथील गट क्रमांक १६ मधील शेतात विषारी औषध सेवन केले. रविवारी सकाळी त्यांचा मुलगा शेतात पाणी भरण्यासाठी गेला असता, वडील शेतात बेशुद्ध अवस्थेत पडलेले दिसून आले. यानंतर त्याने तत्काळ माळीवाडा पोलिस पाटील यांना फोनद्वारे माहिती दिली. पोलिस पाटलांनी ११२ क्रमांकावर संपर्क साधून घटनेची माहिती दिली.यानंतर नातेवाईकांनी सूर्यकांत आस्वार यांना उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. त्याचा पश्चात आई पत्नी एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे दौलताबाद पोलीस ठाणे नोद करण्यात आलीपुढील तपास पोलीस करत आहे

## रेपा येथील तरुणाची शेतात गळफास घेऊन आत्महत्या; गावात हळहळ



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील रेपा येथे एका तरुणाने स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना आज सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.अंकुश माधवराव मस्के (वय ३५, रा. रेपा) असे मृत तरुणाचे नाव असून, आज सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या दरम्यान ही घटना निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी त्यांना तातडीने बोरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.मृताच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील पुन्हा उपोषणास बसणार असल्याच्या पार्श्वभूमीवर अंकुश मस्के हे मागील काही दिवसांपासून मानसिक नैराश्यात असल्याचे सांगण्यात आले.मृत अंकुश मस्के यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा व परिवार असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे गावात शोककळा पसरली आहे.घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर धोंगडे यांनी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून, मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बोरी ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आला आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ मे २०२६



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## मुलूखमाती

असतंच की प्रत्येकाला,जगाच्या पाठीवर आपण कुठेही अन्कसेही असलो तरी,नकळत पाय ओढतातचआपल्या गा ।व शिवारात..कधीकाळी हा बेभरवशाचा धंदापरवडत नाही म्हणून थेट शहर गाठलंतिथेच सुटला पोटापाण्याचा प्रश्नतरिही आपला गाव शिवार प्रिय असतोचआपल्याला...नाही म्हणायला आपणास पाय ठेवायलाहक्काची जमीन आणि डोईवर आपलं एक आभाळपण आजही लाखो - हजारो लोक असे आहे की,त्यांना नसते हक्काची बोटभर जमीन आणि डोईवर छतते मात्र फिरत असतात रानोमाळ पिढ्यानपिढ्यापायाला भिंगरी बांधल्यागत...त्यांच्या जगण्याचा जमाखर्च कोण नी कधी मांडणार ? हा खरा पर्वलीचा प्रश्न आहे.ज्याला नाही त्यालाही मिळावे पोटभर खायलाआणि हक्काची सावली असावी निवाऱ्यासाठी,आयुष्य उधळून लावता येईल असेही नसावेतबिनचेहऱ्यांचे जगणे,मनभर धान्य आणि भरली विहिर असावीआजुबाजूला आपल्या हक्काची,तरच आयुष्य सजवता येईलईथल्या बिनचेहऱ्यांच्या माणसांना,ज्याला चोच आहे त्याच्या दाण्यापाण्याचीसोय करावीच लागते,तो त्याचा नैसर्गिक हक्क आहे.आपण सारेच अशा समृद्ध वारशाचेवारस आहोत,जिथे पेरता ही येईल अन राखता ही येईलहा अवघा मुलूख आणि ही ईथली मातीशाबूत आहे तो पर्यंत आपल्या जगण्याचे कधीही वांधे होणार नाही.सर्वांनाच मिळावेत येथे चौसोपी वाडे, माड्या, हवेल्या अन हक्काची जमीनत्यासाठी कुणावरही जामीन राहण्याची वेळ येणार नाहीआपल्या जीवन - मरणाची लढाई लढल्याशिवायआपल्या बापजाद्यांच्या वाटयाला काहीच येणार नाही.चला तर मग ही शेतीमातीच्या न्याय हक्काची लढाईसोबतीने लढू या !शेतीमातीचे अन शेतकरी समाजाचे निष्ठावंत सैनिक होवू या !कधीतरी आपल्या मायबापांच्या वाटयाला सुखाचे चारघास यावेत म्हणून!

**- डॉ. शिवाजी हुसे**

## "मी पैशाचा हिशोब ठेवत नाही कधी"

मी पैशाचा हिशोब कधीच ठेवत नाही,कारण नात्यांपेक्षा नोटा मोठ्या वाटत नाही.
हातावर ठेवलेले काही क्षण जपून ठेवतो,पण बदललेल्या चेहऱ्यांना मात्र विसरत नाही.

ज्यांच्यासाठी उन्हात स्वतः जळालो,
त्यांच्या सावलीत मी कधीही विसावलो नाही.
ज्यांना आपल्या शब्दांनी धीर दिला,
त्यांनीच कधीतरी शब्दांनी घाव केला.

मी पैशांचा बाजार मांडला नाही,
मनाची श्रीमंती विकायला ठेवली नाही.
जे आले आयुष्यात त्यांना माणूस मानलं,
फायद्याचा हिशोब कधी मांडला नाही.

कोणी हात मागितला तर हात दिला,
कोणी आसवं ढाळली तर खांदा दिला.
स्वतःच्या वेदना लपवून नेहमी,इतरांच्या दुःखाला आधार दिला.

पण वेळ फिरली तशी माणसं फिरली,
ओळखीच्या चेहऱ्यांवर मुखवटे चढले.
कालपर्यंत जीव लावलेले आज नजरेसमोरून परके होऊन निघाले.

मी मात्र आजही तसाच उभा आहे,
मनात जुन्या आठवणींचा दिवा घेऊन.
फक्त आता विश्वास ठेवताना,अनुभवांचा थोडासा पहारा आहे.

कारण जखमा शरीरावर नसतात साऱ्या,
जखमा मनात खोल दडलेल्या असतात.
आणि बदललेले चेहरे हेच तर,
सर्वात मोठ्या वेदनांचे कारण असतात.

मी पैशाचा हिशोब कधीच ठेवत नाही,
कारण पैसा पुन्हा कमावता येतो.
पण बदललेली माणसं आणि तुटलेला विश्वास,
पुन्हा तसाच मिळवता येत नाही.

आजही एखादा जुना चेहरा भेटतो,
तेव्हा मन नकळत भूतकाळात हरवतं.
कधीकाळी आपल्या वाटणाऱ्या माणसांचं,
अचानक परकं होणं खूप काही शिकवतं.

आता मी बुद्धरूपी शांत राहायला शिकलो आहे,
प्रत्येक उत्तर शब्दांनी द्यायचं नसतं.
काही वेळा आयुष्यालाच सोपवायचं असतं,
कारण प्रत्येकाला आरसा दाखवायचा नसतो.



मी पैशाचा हिशोब कधीच ठेवत नाही,
पण माणुसकीचा मान जपतो.
आणि बदललेल्या चेहऱ्यांच्या गर्दीतही,
स्वतःचं खरं मन जिवापाड जपतो.

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## वैभव ठोंबरेची भरारी; १५.६५ लाखांची शिष्यवृत्ती मिळवत गाठली नामांकित विद्यापीठे



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहिली तर ती जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर नक्कीच पूर्ण होऊ शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण निवळी येथील वैभव वैजेनाथ ठोंबरे याने घालून दिले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या या शेतकरी पुत्राने एकाच वेळी देशातील दोन नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवत मोठे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे त्याला तब्बल १५ लाख ६५ हजार रुपयांची शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे.वैभव ठोंबरे याची देशातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या Indian Institute for Human Settlements येथे “एम.एस्सी. सस्टेनेबिलिटी सायन्स अँड प्रॅक्टिस” या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून त्याला १५.६५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यासाठी हे यश अत्यंत उल्लेखनीय मानले जात आहे.याचबरोबर वैभवची Azim Premji University येथे “एम.ए. इन डेव्हलपमेंट” या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी देखील निवड झाली आहे. सामाजिक विकास, ग्रामीण परिवर्तन आणि शाश्वत विकास या विषयांमध्ये वैभवला विशेष रुची असून त्याने सातत्यपूर्ण अभ्यास आणि सामाजिक भान जपत हे यश मिळवले आहे.तसेच Shiv Nadar Institution of Eminence येथे “एम.ए. इन रुरल मॅनेजमेंट” या अभ्यासक्रमाच्या मुलाखतीसाठीही त्याची निवड झाली आहे. त्यामुळे वैभवच्या शैक्षणिक प्रवासाला आणखी नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.घरची परिस्थिती अत्यंत कठीण असतानाही वैभवने कधीही हार मानली नाही. शेतकरी कुटुंबातील मुलगा म्हणून अनेक आर्थिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जात त्याने शिक्षणाची वाट अखंड सुरू ठेवली. या यशाचे श्रेय त्याने आपल्या आई-वडिलांसह Eklavya India Foundation, Path Education Foundation तसेच कठीण काळात साथ देणाऱ्या मित्रपरिवाराला दिले आहे.“अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न सुरू ठेवले, त्यामुळेच आज हे यश मिळाले,” अशी भावना वैभवने व्यक्त केली. भविष्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छाही त्याने व्यक्त केली आहे.वैभव ठोंबरे याच्या या यशामुळे निवळी गावासह संपूर्ण परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून ग्रामीण भागातील युवकांसाठी त्याची यशोगाथा प्रेरणादायी ठरत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ मे २०२६


## दिवा

अचानक लाईट गेली
एकदा रात्रीच्या वेळी
दिव्यांच्या शोधात
सर्वांची पळापळी

कोनाड्यात दिसला
बाबांना एक दिवा
आई म्हणाली
आता झटपट लावा

बाबांनी उगाळली काडी
पण त्यात नव्हती वात
हताश होऊन आईने
डोक्यावर मारला हात

आजीने केली वात
कापडाची चिंधी फाडून
पण दादाच्या धक्क्याने
तेल गेले सांडून

रागावून बाबा म्हणाले
कार्ट शफारलं फार
एवढ्यात आली लाईट
बाबांचा चुकला मार




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## कोप सूर्याचा होताच

झाड जंगल तोडताच,
सिमेंटचे जंगल वाढले.
झाडं लावण्याची वर्दी,
आता शासनाने काढले. १

सूर्य कोपून रागाने,
आता ओकतोय आग.
आता तरी माणसा,
तू कर्तव्याला जाग. २

कोप सूर्याचा होताच,
सहन कसे करावे ?
म्हणून म्हणतो माणसा,
एक तरी झाडं लावावे. ३

एक एक झाड लावून,
पृथ्वीची आग शमवावे.
हिरव्या हिरव्या झाडांनी,
धरती मातेला सजवावे. ४

हिरवे हिरवे झाडे पाहून,
सूर्याची होईल कोप कमी.
तेव्हा कुठे मिळेल तुला,
सुखाने जगण्याची हमी. ५


**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# होय! 'अर्बन हीट आयलंड' चे 'ग्रीन आयलंड' करणे शक्य आहे - पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ




आपले वैयक्तिक अनुभव हे अनेकदा खूप बोलके असतात; एक प्रकारे हे अनुभव 'इम्प्रेशनिस्टिक रिसर्च' (Impressionistic Research) यामध्येच मोडतात. पूर्वी जळगावात मे महिन्याच्या भर दुपारीही आम्ही मुले रस्त्यांवर सहज खेळायचो आणि त्याकाळी सुद्धा 40 ते 45 अंश सेल्सिअस तापमान हे जळगावकर मंडळींनी नेहमीच अनुभवले आहे. आम्हाला पक्षी निरीक्षणाचा छंद जडल्यापासून भर उन्हाळ्यातही सकाळी अकरा वाजेपर्यंत आम्ही बाहेर असायचो. पण गेल्या काही वर्षांत, आणि विशेषतः या वर्षी, सकाळी साडेआठ ते नऊ वाजेच्या सुमारास घरात परतावे लागत आहे, इतकी भीषण स्थिती निर्माण झाली आहे. या दाहक उष्णतेचा अनुभव आपण सारेच घेत आहोत, त्यामुळे वाढत्या तापमानाविषयी कोणत्या विशेष तज्ज्ञाच्या अहवालाची किंवा पुराव्याची गरज भासणार नाही.या वर्षी मार्च महिन्याच्या मध्यावरच वाढत्या तापमानाची झळ पोहोचू लागली. सूर्य जणू आग ओकत असल्याचे जाणवू लागले, सोबत भीषण उष्णतेच्या लाटांमुळे मानवी जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. पाणावठे कोरडे पडले आहेत, कष्टकऱ्यांना सकाळी नऊनंतर काम करणे अशक्य झाले आहे. वाढत्या तासांच्या लोडशेडिंगमुळे इन्व्हर्टर बंद पडल्याने उन्हाची तमा नसणारा मध्यमवर्गीही हैराण झाला आहे. 'लू' म्हणजेच उष्ण वाऱ्यांमुळे बालकांपासून वृद्धांपर्यंत निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडत आहेत, तर जनसामान्यांच्या आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. प्रचंड उष्णतेने दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत आहेत आणि रात्रीही हवेतील दाहकता कमी होत नाहीये. सिमेंट-काँक्रीटच्या अविचाराने उभारलेल्या जंगलांमुळे आपली शहरे आता मानवी वस्तीसाठी राहण्यायोग्य राहिलेली नसून, ती उष्णतेची धगधगती केंद्रे म्हणजेच 'अर्बन हीट आयलंड' बनली आहेत.पण नागरिक बंधू-भगिनींनो, निसर्ग आणि माणूस यांच्या समतोलाचा विचार न करता आपण जी विकासनीती अंगीकारली, निसर्गविरोधी शहरांची रचना स्वीकारली, त्यामुळे आपली शहरे ही 'अर्बन हीट आयलंड' झाली आहेत. पण अजूनही वेळ गेलेली नाही, आपण जर सर्वांनी इच्छाशक्ती दाखवली तर आज आपल्या शहरांचे जे 'हीट आयलंड' झाले आहे, ते 'ग्रीन आयलंड' करणे पूर्णपणे शक्य आहे! हा माझा केवळ एक भाबडा आशावाद नसून, शास्त्रीय निकष आणि आपल्याला मिळालेले घटनात्मक अधिकार यांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास हे सहज साध्य आहे. सध्याचे संकट मोठे आहे आणि मार्ग सोपा नाही, मात्र तो अशक्य नक्कीच नाही. हे बदल घडवून आणणारे माझे 'वरवरचे झुरळी उपाय' नसून, निसर्ग ओरबडणाऱ्या राजवटींनी दुर्लक्षित केलेले जागतिक आरोग्य संघटना (WHO) व संयुक्त राष्ट्रे (UN) यांचे निकष कोणते आणि भारतीय संविधानाने दिलेले अधिकार कोणते, ते आपण समजून घेण्याची गरज आहे. त्यांच्या निकषांच्याच आधारे आपण आपल्या शहरांचे 'ग्रीन आयलंड' करू शकतो, असा ठाम विश्वास आपल्यात नक्कीच निर्माण होईल.प्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की शहरांचे पर्यावरण टिकवणे ही जशी शासनाची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे, तसेच तो आपल्या नागरिकांचा घटनात्मक अधिकारसुद्धा आहे. भारतीय संविधानाच्या कलम 48-अ नुसार, देशातील पर्यावरण सुधारणे, तसेच वने व वन्यजीवांचे रक्षण करणे हे राज्याचे म्हणजेच शासनाचे मार्गदर्शक कर्तव्य आहे. यासोबतच, कलम 51-अ (छ) नुसार, वने, तलाव, नद्या आणि वन्यजीवांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे, त्यात सुधारणा करणे आणि सर्व सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. इतकेच नव्हे तर, कलम 21 अंतर्गत असलेल्या 'जीवितेच्या अधिकारा'मध्ये नागरिकांना प्रदूषणमुक्त आणि सुसह्य वातावरणात जगण्याचा हक्कही सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला आहे. त्यामुळे 'ग्रीन आयलंड'ची इच्छा धरणे, तशी मागणी करणे हा केवळ एक विरंगुळा नसून, तो आपल्याला दिलेल्या घटनात्मक अधिकाराचा आणि हक्काचाच भाग आहे.जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्रे यांनीही शहरांमधील वाढते तापमान नियंत्रित करण्यासाठी आणि मानवी आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी नागरी वृक्षलागवडीचे काही अत्यंत कडक आणि शास्त्रीय निकष निश्चित केले आहेत. हे निकष केवळ पर्यावरणाचा भाग नसून आधुनिक नगरनियोजनाचा मुख्य कणा मानले जातात. शहरांचे वाळवंटीकरण रोखण्यासाठी आणि नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी या आंतरराष्ट्रीय मानकांची अंमलबजावणी करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका मुख्य शोधनिबंधानुसार, शहरात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी किमान 9 चौरस मीटर हिरवळीचे क्षेत्र असणे अनिवार्य आहे. हे हरित क्षेत्र उद्याने, खुली मैदाने किंवा थेट वृक्षाच्छादनाच्या स्वरूपात असावे. हवेतील घातक सूक्ष्म धूलिकण शोषून घेण्यास, हवेची गुणवत्ता सुधारण्यास आणि नागरी वस्त्यांमधील श्वसनाचे आजार रोखण्यास हे प्रमाण अत्यंत आवश्यक मानले जाते. ज्या शहरांमध्ये हा निकष पाळला गेला आहे, तिथे नागरिकांचे आरोग्य अधिक उत्तम असल्याचे वैज्ञानिक संशोधनातून सिद्ध झाले आहे.यासोबतच, संयुक्त राष्ट्रे आणि जागतिक पर्यावरण संस्थांद्वारे मान्यताप्राप्त '3-30-300' हा आधुनिक नियम जागतिक नागरी वनीकरण तज्ज्ञ प्रो. सिसिल कोनिजिनेंडिज्क यांनी मांडला असून, तो थेट नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि त्यांच्या राहत्या घराशी जोडलेला आहे. या नियमातील पहिल्या निकषानुसार, प्रत्येक नागरिकाला त्याच्या राहत्या घराच्या किंवा कार्यालयाच्या खिडकीतून किमान 3 मोठी झाडे स्पष्ट दिसली पाहिजेत. मानसोपचारशास्त्रानुसार, हे हिरवे दृश्य मानवी मेंदूतील ताणतणाव कमी करून कोर्टिसोल संप्रेरकाची (Cortisol Hormone) पातळी वेगाने खाली आणते. दुसऱ्या निकषानुसार, शहराच्या प्रत्येक वॉर्डाचा किंवा परिसराचा किमान 30 टक्के भाग हा झाडांच्या पानावळीने/ पानांच्या छताने (Canopy) आणि फांद्यांनी व्यापलेला असावा, ज्यामुळे सिमेंट आणि काँक्रीटमुळे शहरांमध्ये निर्माण होणारा 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट' कमी होऊन स्थानिक तापमान 3 ते 5 अंश सेल्सिअसने थेट कमी होते. तिसऱ्या निकषानुसार, कोणत्याही नागरिकाच्या घरापासून जास्तीत जास्त 300 मीटर अंतरावर, म्हणजेच साधारण 5 मिनिटांच्या पायी अंतरावर, किमान एक सार्वजनिक उद्यान किंवा हरित क्षेत्र उपलब्ध असावे. यामुळे नागरिकांमध्ये शारीरिक सक्रियता वाढते आणि हे हरित पट्टे भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी 'स्पंज'सारखे काम करतात. या नियमाची व्यावहारिक उपयुक्तता आणि मानसिक आरोग्याशी असलेला सकारात्मक संबंध डॉ. न्यूवेनहुईसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या जागतिक आरोग्य संशोधनातही अधोरेखित झाला आहे.संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येय क्रमांक 11 (SDG ११) अंतर्गत असलेल्या उप-ध्येयानुसार, आगामी काळात शहरांमधील सर्व नागरिकांना, विशेषतः महिला, मुले, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि सुलभ हरित व सार्वजनिक जागा विनाव्यत्यय उपलब्ध करून देणे हे शासनाचे आणि स्थानिक प्रशासनाचे कायदेशीर कर्तव्य आहे. शहरे हवामान बदलाशी जुळवून घेण्यास सक्षम बनवण्यासाठी आणि मानवी आरोग्याला सुरक्षित ठेवण्यासाठी या आंतरराष्ट्रीय मानकांचा आणि आपल्या घटनात्मक चौकटीचा नागरी विकास आराखड्यात समावेश करणे हाच आता एकमेव शास्त्रीय व कायदेशीर मार्ग आहे. तरच आपण आपल्या शहरांचे 'हीट आयलंड' कडून 'ग्रीन आयलंड'कडे यशस्वी पाऊल टाकू शकू! मात्र प्रश्न आहे आपल्या नागरिकांच्या इच्छेचा, इच्छाशक्तीचा.आपली झुरळी इच्छाशक्ती जागी असेल ,जागी झाली तरच व्यवस्थेची राजकीय इच्छाशक्ती जागी होईल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ मे २०२६


## मराठी कवितेतील ‘बालकवी’ : आनंद, निसर्ग आणि संवेदनांचा अमर स्वर


'बालकवी'...अठ्ठावीस वर्षे वयाचा एक तरूण आपल्या धुंदीत चालला होता. जवळची वाट पकडायची म्हणून तो रेल्वेचे रूळ ओलांडून जाणाऱ्या छोट्या पायवाटेने निघाला सा. दोन रूळ एकत्र येवून पुढे जाणाऱ्या ठिकाणी तो उभा होता. तेवढ्यात त्याला मालगाडीची शिट्टी ऐकू आली. ही गाडी दुसऱ्या रूळावरून जाईन असा अंदाज होता पण ती नेमकी तो चालला होता त्याच रूळावर आली. घाईघाईत रूळ ओलांडताना त्याची चप्पल तारेत अडकली. ती सोडवण्यासाठी तो खाली झुकला. तोपर्यंत मालगाडी त्याच्या देहाचे तुकडे तुकडे करून निघून गेली. हि दु:खद घटना 5 मे 1918 ची आहे.एरव्ही ही घटना पोलीसांच्या नोंदीत अपघात म्हणून जमा झाली असती.पण हा तरूण म्हणजे कोणी सामान्य इसम नव्हता. मराठी कवितेत ‘बालकवी’ म्हणून अजरामर ठरलेल्या "त्र्यंबक बापूजी ठोंबरे" यांची ही गोष्ट आहे. जळगांव जिल्ह्यातील भादली या रेल्वेस्टेशनवर हा अपघात घडला. किती जणांना आठवण आहे या कवीची?आनंदी आनंद गडेइकडे तिकडे चोहिकडेवरती खाली मोद भरेवायूसंगे मोद फिरेनभांत भरलादिशांत फिरलाजगांत उरलामोद विहरतो चोहिकडेआनंदी आनंद गडे!अशी सुंदर आनंदावरची कविता लिहीली त्यांची आठवण हा जागतिक हास्य दिवस साजरा करणाऱ्यांना होणार नाही. आनंदाचे तत्त्वज्ञान अतिशय साध्या सोप्या भाषेत लिहीणारा हा कवी ज्यानं आनंदाची केलेली व्याख्या किती साधी सोपी आणि मार्मिक आहेस्वार्थाच्या बाजारातकिती पामरे रडतातत्यांना मोद कसा मिळतोसोडुनी तो स्वार्था जातोद्वेष संपला मत्सर गेला आता उरलाइकडे तिकडे चोहिकडेआनंदी आनंद गडे!बालकवींचा जन्म 13 ऑगस्ट 1890 रोजी धरणगाव (जि. जळगांव) इथे झाला. केवळ 28 वर्षांचे आयुष्य लाभलेल्या या कवीने अतिशय मोजक्या पण नितांत सुंदर आणि नितळ भावना व्यक्त करणाऱ्या कविता लिहून मराठी वाचकांवर मोठे गारूड करून ठेवले आहे.श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे, क्षणात येती सरसर शिरवे क्षणात फिरूनी उन पडे किंवा हिरवे हिरवे गार गालीचे हरित तृणाच्या मखमालीचे त्या सुंदर मखमालीवरती फुलराणीही खेळत होती..या सारखी गोड रचना असो. आपल्या साध्या सुंदर शब्दकळेने बालकवी वाचकाच्या मनात घर करून राहतात. अशा सुंदर साध्या गोड कविता लिहीणाऱ्याला आपण विसरून जातो. त्यांच्या जयंत्या पुण्यतिथ्या आमच्या लक्षातही राहत नाहीत. गावोगावच्या साहित्य संस्था कित्येक उपक्रम सतत करत असतात. तेंव्हा ज्यांची जन्मशताब्दी होवून गेली आहे अशा मराठी कविंवर काहीतरी कार्यक्रम करावे असे का बरे कोणाच्या डोक्यात येत नाही? एक साहित्य संमेलन केवळ शताब्दि साहित्य संमेलन म्हणून नाही का साजरे करता येणार? केशवसुत, बालकवी पासून ते कुसूमाग्रज, मर्ढेकर, अनिल, इंदिरा संत, ना.घ.देशपांडे, बा.भ.बोरकर, वा.रा.कांत, ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील अशी कितीतरी नावे आहेत. शंभरी पार केल्यावरही टिकून राहणाऱ्यांची आठवण न काढणे हा आपलाच करंटेपणा आहे.या जून्या कविंची आठवण का काढायची? कोणाला वाटेल कशाला हे सगळे उकरून काढायचे. पण जर जुनी कविता आपण विसरलो तर पुढच्या कवितेची वाटचाल सोपी रहात नाही. बा.भ.बोरकर लिहून जातात.तू नसताना या जागेवर चिमणी देखील नच फिरकेकसे अचानक झाले मजला जग सगळे परके परकेआणि पन्नास साठ वर्षे उलटल्यावर संदिप खरे सारखा आजचा कवी लिहीतोनसतेच घरी तू जेंव्हा जीव तुटका तुटका होतोजगण्याचे तुटती धागे संसार फाटका होतोआजचा कवी काळाच्या किती मागे किंवा पुढे आहे हे समजण्यासाठी जूने कवी वाचावे लागतात. त्यांची कविता समजून घ्यावी लागते. जी कविता काळावर टिकली आहे निदान तेवढी तरी कविता आपण वाचणार की नाही? आणि ती नाही वाचली तर मराठी कवितेचेच नुकसान होते.बालकवींच्याच आयुष्यातील एक काळीज हेलावून टाकणारा प्रसंग आहे.त्यांच्या शरिराचे तुकडे तुकडे त्यांचे स्नेही आप्पा सोनाळकर पोत्यात भरत होते. त्यांच्या डोळ्यातून अश्रू खळाखळा वहात होते. बालकवींच्या सदऱ्याकडे हात जाताच आप्पांच्या लक्षात आले की आत घड्याळ आहे आणि ते अजूनही चालूच आहे. बालकवींची एक अप्रकाशित कविता आहेघड्याळांतला चिमणा काटाटिक_ टिक् बोलत गोल फिरेहे धडपडते काळिज उडतेविचित्र चंचल चक्र खरे!*घड्याळातला चिमणा काटात्याच घरावर पुन्हा पुन्हाकिति हौसेने उडत चालला*स्वल्प खिन्नता नसे मना!*काळावर इतकी सुंदर कविता लिहीणारा हा कवी आपण कशासाठी जातीपातीच्या चौकटीत, नफा नुकसानीच्या हिशोबात मोजायचा?शंभर वर्षांपूर्वी होवून गेलेला हा कवि आनंदाचे उत्साहाचे कारंजे आपल्यापुढे कवितेत ठेवून गेला आहे. त्याच्या डोळ्यापुढचे त्याच्या स्वप्नातले जग कसे होते?सूर्यकिरण सोनेरी हे कौमुदि ही हंसते आहेखुलली संध्या प्रेमानेआनंदे गाते गाणेमेघ रंगलेचित्त दंगलेगान स्फुरलेइकडे तिकडे चोहिंकडे आनंदी आनंद गडे !बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांच्या पवित्र स्मृतीसविनम्र अभिवादन..-प्रा डॉ राजेंद्र सोनवणे. मराठी विभागजे ई एस महाविद्यालय जालना.



**प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे. (जे ई एस महाविद्यालय जालना.) मराठी विषयाचे प्राध्यापक, समीक्षक, व शिक्षण तज्ञ आहेत.**

## ह्याचसाठी केला होता अट्टाहास!

साहित्य सृजन, सज्जनहो,सस्नेह नमस्कार.गेल्या दीड वर्षा पूर्वी मी समीक्षणार्थ अलीकडे प्रकाशित झालेले पुस्तकं पाठविण्यासाठी आवाहन केले होते आपण माझ्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला, नवागतांसह प्रसिद्ध ज्येष्ठ लेखक कवींनीही विश्वास व्यक्त केला, आजवर आलेल्या पैंकी 113 पुस्तकांचे समीक्षण केले . त्याची अनेक वृत्तपत्रांनी दखल घेतली व प्रसिद्धीही दिली. सर्व संपादक, वार्ताहर,वृतप्रतिनिधी व लेखक,कवी, साहित्यिक बंधु-भगीनींचे मनापासून आभार!!!हाच लोभ, जिव्हाळा, आपुलकीचा अनुबंध यापुढेही असू द्या .*माझ्या समीक्षणावर अनेक मित्रांनी मनापासून निरपेक्ष अभिप्राय नोंदलवा . भ्रमणध्वनी वर संपर्क साधून लेखनाविषयी आस्थेने चर्चाही केली. त्यामुळे इथंवर आलो सर्वांना धन्यवाद!!!लवकरच नवोम्मेषी साहित्य समीक्षा हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा मानस आहे.) काही निवडक नामावली.... 1)स-समीक्षेतला-विद्रोही कविता संग्रह (संपादन-प्रा ज्योती देसाई, पुणे)०2) वात्सल्य सिंधू आई -प्रातिनिधीक काव्यसंग्रह (संपादन -डॉ नरेंद्र खैरनार, साक्री)3) शेलक्या बारा -कथासंग्रह(प्रा इंद्रजित पाटील, धाराशिव)4) स्वयं प्रकाशित व्हायचंय मला -काव्यसंग्रह( प्रणालि मराठे,धळे)5) चंद्रकला -कादंबरी(राजाराम जाधव, मुंबई)6)जागरण-आत्मचरित्र (भारत सातपूते , लातूर)7) शब्दफुले -काव्यसंग्रह(प्रा पंढरीनाथ बनसोडे, नागपूर)8)सत्यार्थ दीपिका-काव्य संग्रह (सौ मंगलाताई रोकडे, एरंडोल)9)पान हिरवे या मनाचे -गझलसंग्रह(काशिनाथ महाजन, नाशिक)10)कळ पोटी आली ओठी -काव्यसंग्रह, अष्टाक्षरी (प्रा इंद्रजित पाटील, धाराशिव)11) माझ्या अंगात येऊ दे -कथासंग्रह(प्रा सुभाष पाचारणे, पुणे)12) ताटातूट -कथासंग्रह(गोकुळ गायकवाड, लातूर)13) अस्तित्व -कथासंग्रह(, शिवराज सगळे, अहमदनगर)14) फक्त तुझ्याचसाठी -काव्य, चारोळी (संजय गायकवाड, नागपूर)15)ऑल इज वेल -वैचारिक लेख (प्रा विनय मिरासे, यवतमाळ)16) कन्यादान -कादंबरी( प्रा प्रिती. योसेफ बनकर, वैजापूर)-17)--प्रक्षोभ -डा ॅ शिवाजी (, आत्मचरित्र))18/) डॉ शिवाजी जाधव ---तिम्मा (कादंबरी)..........तेआजपर्यंत"दुष्टचक्र" कथासंग्रह हे 113 वे समीक्षण .*10 साहित्य कृतींचे समीक्षण प्रकृती ठीक नसल्याने पेंटिंग*आपले साहित्य समीक्षणार्थ स्नेहपूर्वक पाठवा स्नेहाभिलाषि विद्रोही



**- कवी साहेबराव मोरे, ज्येष्ठ समीक्षक चाळीसगाव संवाद - 9404048601**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर


| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ मे २०२६


# वंशावळीच्या प्राचीन सरीतून - बाईच्या अव्यक्त हुंकाराचे कढ




**का**व्य योगिनी प्रतिभा खैरनार यांच्या कविताचा अनुबंध हा अतिशय चिंतन आशय संपन्नतेचा आहे.ही वंशावळ म्हणजेचं बाईचं माईचं स्त्रीचं प्रसववेदनेची अनादी अनंत कळ.या कवितेने तत्कालीन ते समकालीन बाईच्या खोलवर भळभळणाऱ्या जखमेची अलवार खपली काढली आहे.बाई म्हणजे केवळ या वंशावळीची प्राचीन सरी आहे.ओटीपोटीचं बाईचं बाईपण बाईलाचं कळतं इतकं सजगतेने या कवितेतून व्यक्त होतं ही कविता अतिशय टोकाची सृजनशील आत्मानुभूती देऊन जाते.चुलीचं जळण तव्याचं पोळण अन् बाईचं मळणं म्हणजे आयुष्य कोंडुन घेणं हे फक्त बाईलाच कळतं.या वंशावळीसाठी ती या देहाचीआत्माहुती देते.तिच्या रुपाची जणू ती ओंजळभर सुखानुभूती असली तरी मरणयातना ही या वंशावळीची सरी आहे.जसं माती ही सिझर कर म्हणते पण इथं त्याच भूईमातीच्या साक्षीने बाई सरमाडाच्या आडोशाला बाळांत होते.कवयित्री लिहिते"भळभळणारी योनी आ वासून/घालू पाहत होती पोटात अख्खी सृष्टी/अन् तेवढ्यात एक कळेसरसी/रक्ताचा पाट वाहू लागला/वंशाळीच्या प्राचीन सरीतून (पृ.२२)जलमाला आली पुन्हा सोशिकतेचा वसा चालवणारी असहाय मादी.मरणकळा भोगून ही इथे जगण्याचा ठाम निर्धार आहे.पदर फाडलेलं बाळूतआंदण.अभागीपणाचं कपाळभर गोंदण घेऊन ही जगते इथल्या पुरुषांसाठी.ही घुसमट कायमचं आहे.त्या काचेच्या बांगड्या,ते कपाळभर ठसठशीत कुंकू,जोडवे.हेदु:खाची सल देणारं असलं तरी हा स्त्रीच्या देहमनाचा आरसा किती ही टिचू द्या.हा धारधार निर्धार घेऊन ती या व्यवस्थेत ती जगते आपल्या मातृत्वासाठी.तिला नकोय वांझोट्या काटेरी वेदना.म्हणून या निर्मीकानेचं तिला हे अगाध सोशिकपणाचे बळ दिले आहे.'जायबंदी'या कवितेने मन सुन्न होते.मरण सरण कलेवराचा भोग घेणारा दारुड्या.घासलेट टाकून सरण पेटलं पण दारुचा वास नाही जळाला.तिला जाळलं तिचे लांबसडक काळेभोर केस भिंतीला चिटकले.हळदीचा अन् कुंकूवाचा डाग जळून गेला.पण त्याने दिलेल्या जखमा नाही जळाल्या.दारुच्या उधारीसाठी मित्राच्या स्वाधीन केले.या कवितेचा आत्मा."कवटी फुटली/अन् भानवर आले मी/माझं चार महिन्याचं लेकरू/झोळीत झोपवून आले होते/पान्हा फुटला/अन् सरणावरून उठून धावावं वाटलं/पण कुठल्याशा बेड्यांनी/पाय जायबंदी झालेले"/(पृ.२६)हीमातृत्वाची इश्वरी देणं आहे.बाईच्या आत्मानंद म्हणजे लेकरू हीच तिची खरी श्रीमंती आहे.म्हणून देह गेला तरी आत्मिक भावना स्त्री सत्याच्या आहे.अनंत यातनेचा गुहेत ती जगत असते.निवडूंग काटेरी आहे.ती मनभावन होऊन त्याला बिलगतेच.अन् उधळून देते या रक्ताळलेल्या देहाच्या चिंध्या.पुन्हा ती कधीचं भेटत नाही.हा बाईचा अमोघ अनमोल ठेवा आहे.तिचं तिलाच कळत नाही हा मोह म्हणावा की देहाचा होम.ती अनुत्तरीत.बाईचं हे जगण्याचं सारं सावलीत आहे पण आयुष्य पोळून काढण्यासाठीच.क्षणीक सुखाच्या परमोच्च आनंदासाठीमग ही कविता एक गारुड करून जाते मनावर.'पाळी आणि बाई' हे देहाचं अप्रुप आहे सुखाचे मनपाखरू आहे पण बाई नाहीना मोठ्याने बोलू शकत.ती विचारपीठावर बिनधास्त मुक्त व्यक्त होऊ शकते.तरीही 'घरंदाज हुंदके'दळताना जातं,पाणी शेंदतांना विहीर,धुनं धुताना खडकं,गोवऱ्या थापताना करुड,न्हानीत वजरी, चुलीजवळ फुकणी,या मुक्या वस्तूला ती आपल्या मनाती जाचाच्या चिंध्या अर्पण करते.यातं कुणाची वाईट नजर ती घासून काढते.अशी ही स्त्रीवंशाची सखेद वेदना ही कविता मुखर करते.या सोसल्या भोगल्यापणाची वेदना पुन्हा ती रांगोळीत भरते 'टिंगाची रांगोळी'किती हो सुरेख पण सारे नी सगळेच रंग हे दुःखाचे कुणालाच कळतं नाही.बाई जगते ती केवळ आयुष्याच्या रांगोळीत रंग भरण्यासाठी.कारण संयमाचं शेन सारवण तिच्याकडे आहे.हे सारं ती मनातल्या तळसांदीत ठेवते अन् उपरं हसू आणून ती निर्धाराने जगते.कारण हा आयुष्याचा पसारा तिला आवरायचा असतो.'श्री' तिच्या आयुष्याचा पहिला पुरुष.कविता समृद्ध सकारात्मक विचारधारेची होतं जाणे म्हणजेच 'वेदना'हळूवार सांगणे.ही 'झळ'सृजन संपन्नतेचीअसते.अनेक 'सुंगधी डोह'येतात या जगण्याच्या मोहात तीमुक्त होते पण डोह डुख धरतो.मग 'मेकअप ओव्हर' बाई सदोदित मनाचं चिमुकलं पाखरू होऊन उडत असते.ओठ,भुवई,डोळे,कान अन् त्वचा ती सौंदर्यासाठी निहाळत असते.या व्यवस्थेच्या भरल्या बाजारासाठी.बाई जखडं म्हतारी झालीतरी तिला नटणे आवडते.श्वास जाताने ही तिने पदर डोहीवर घेतला.कविता 'सखी' होऊन जाणे.'मुंग्या अन् मुली'घर दाराचा आसरा शोधत असतात.पण या मनाच्या वारूळात तिचं दमकोंडी अन् व्यवस्थेच्या वारुळात बारुळा नागगारुडी टपलेलाचा असतो.अशी उत्तम आशय संपन्न बाईच्या खोलवर वेदनेचा तळ शोधणारी ही कविता आहे.जसा नदीला नसतोच कायमचा किनारा ती अखंड वाहत असते.बाईचं ही नेमकं तेचं आहे.'नर्मादा' होऊन वाहत राहणं.'गुंता,संगम,पदर, विहीरीवर गेलेली बाई,बंधारा,वात,चुंबळ,या कवितेमधून आजच्या ग्रामीण वास्तवाचे बाईचे साक्षात चुंबळ झालेली आहे.तिचंजगणं, "गाठ मारुन चोळीला, पदराचा मोठा काठ. कुंकू भरल्या भांगात,एक तहानला माठ रक्तातल्या हातामधी,साऱ्या बांगडीच्या काचा. मुक्या गर्भात पोसतो,दुबाळया बाईचा साचा"(पृ.५७)या वंशावळीच्या प्राचीन सरीतून ती 'श्वास'घेऊन ती बाहेर पडते.दिवसभारांच्या वासनांध नजरा, प्रचंड शिनवटा, आणि शेवटी नवरा त्याचा घानेरडा दर्प.हे सारे सोसून झाल्यावर ती 'तथागत बुद्धांच्या निश्चल'बिछान्यावर पडून उद्याच्या सूर्यादयाची वाट पाहते.अगदी अप्रतिम प्रतिमांच्या माध्यमातून ही कविता बोलते.म्हणजे हाच 'मध्यम मार्ग आहे' तथागतांचा.आई माई भूई गाई बाई नेहमीचं दुःखाला कवटाळून आल्या आहेत.म्हणून दुःख लडीवाळ आहे.बाईच्या वाट्याला सवाष्णपणाचा नवा पट येतो आणि ती आर्ततेने हे सारं सहन करते.हा 'परिघ'जन्मोजनमीचा होऊन जातो.जसे "जन्मोजन्मी मागते,बाई प्रसव वेदना. वांझपणाच्या कपाळी.मातृत्वाचा परगणा. लेक रेखते आईच्या,माथी सुखाची ग रेघ. एक माय दुजी लेक, एका बिंदूचा परिघ"(पृ.६२)ही कविता जशी वेदना मुखर करते तशी ती नव्या मनोभूमिकेतून संयत विद्रोह ही पेरत जाते.'हे सुंगधी जखमा कुरवाळत बसू नकोस,फसवे उटने लाऊ नकोस.हातात हे क्रांतीचे लाटणे.बाईपणाच्या वेदना, स्वल्प विराम, वेलांटी काना,मात्रा, प्रश्नचिन्ह,शेवटी पुर्णविराम म्हणून तूझं बाईपण सिध्द कर.हा बाईपणाचा 'अनुवाद' भेटी,पायधुळ, अस्तित्व,जीव,व कलंक या निस्सीम बाईपण सिध्द करणाऱ्या कविता आहे.तू या सौंदर्यांने कलंकीत होऊ नकोस.बाईचं आणि चुल ही केवळ जाळ,धगधग आणि आग पण दोन्ही बहिणीचं.बाईची किंकाळी फोडली तर कुणीचं येत नाही.पण जातिय फुणगी ठिनगी पडली तर गदारोळ होऊन जातो.तेंव्हा हे बळ कोठून येते.बाई शीलवंत,कुळवंत,भाग्यवंत असते कारणं ती मातृत्व घेऊन आलेली आहे.या वंशावळीच्या प्राचीन सरीतून एक सृजनशील प्रतिभेचा आविष्कार आहेचं.पण या सुलभ प्रतिमेतून ही कविता अत्यंत खोलवर आशय देऊन जाते.युगानुयुगे या पाऊलखुणा तीगोंजारत बसते कारण तिला दुःखाच्या 'लेण्या',यात "जगाची भूक भागविण्याकरता भूई मारुन घेते/अंगावर मारुन घेते हिरवे ओरखडे/अन् तू वंशावळीची भूक भागवण्याकरीता कोरून घेते ओटीपोटीवर/सुखाच्या कोरीव लेण्या"(पृ.८५)अशी ही कविता बाईच्या अलवार वेदनेचा हुंकार होऊन येते.तण,कोडी भाकर, बाईच्या आतली बाई,तहान,पितळी घंटा,चाळीशीच्याउंबरठ्यावर,क्रांतीज्योती सावित्रीमाई साऊ यांच्या प्रेरणेचा स्त्रोत ही कविता देऊन जाते.कपाळावरचं कुंकू आणि हिरव्या बांगड्या हेच निर्लेप बळ मानणारी स्त्री पुढे संघर्षरत झाली.'लालभढक गुंजावर काळ्याभोर ठिपका'अस्वस्थ क्षणाचे डंख, काळाकुट्ट बुका,सहनशीलतेच्या जात्यात भरडून'या अशा शैलीने ही कविता आशय संपन्न झाली आहे.पण बाई कधीचं करतं नाही आत्महत्या' हा बाईच 'ब'की ब बळीचा.ही प्राचीन 'तडफड', अव्यक्त हुंकाराचे भगदाड,वास्तविकतेचा विस्तव, तिनें कुणाच्या ही सरणावरच लाकुड होऊ नये.एकूनच ही स्त्री वेदनेची सशक्त कविता आहे.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध डॉ.रणधिर शिंदे,कवी पी.विठ्ठल,श्रीकांत देशमुख, ऐश्वर्य पाटेकर, दुर्गेश सोनार,दा.गो.काळे यांनी बांधला आहे.पाठराखण कवी सौमित्र यांची आहे.कपाळभर कुंकू,नाक डोळे ओठ नाजूक हनुवटी,अन् लांबसडक वेल केससंभार,त्यावर झुल घातलेला पुरुष पक्षी.अरविंद शेलार यांचे आशय अर्थांकित मुखपृष्ठ.अतिशय देखणं.कवयित्री प्रतिभा खैरनार यांना हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक - वंशावळीच्या प्राचीन सरीतूनकवयित्री:-प्रतिभा खैरनार ,नांदगाव प्रकाशक परिस पब्लिकेशन,मुखपृष्ठ अरविंद शेलार दुसरीवृत्ती - २० मार्च २०२६ किंमत:-१८०/रूपये पुस्तक परिचय**




**-डॉ प्रभाकर शेळके,जालना**



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ मे २०२६


# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज - डॉ. राजेंद्र बगाटे

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी ‘आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन’ साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते.एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणीय नाही तर सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. शहरांमध्ये वाढणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे तुंबतात आणि पूरस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे शहरे जलमय होतात. यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. प्लास्टिक कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या बनली आहे.ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात.शिक्षण संस्थांची भूमिका प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शाळांमध्ये प्लास्टिकऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. विविध स्पर्धा, रॅली, प्रबोधन कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होऊ शकते.महिलांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त समाज उभारण्यात महत्त्वाची आहे. घरातील खरेदी, स्वयंपाकघरातील साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले तर संपूर्ण कुटुंबात चांगली सवय निर्माण होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे.आज अनेक उद्योग आणि कंपन्याही प्लास्टिक कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही कंपन्या पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग वापरत आहेत. जैवविघटनशील प्लास्टिक, कागदी पॅकेजिंग आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला जात आहे. पर्यावरणपूरक उत्पादनांना ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्यामुळे उद्योगक्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. तथापि, अजूनही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर होत असल्यामुळे अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे.पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ही प्लास्टिक समस्येवर मात करण्याची महत्त्वाची साधने आहेत. सर्व प्लास्टिक टाळणे तात्काळ शक्य नसले तरी त्याचा योग्य वापर आणि पुनर्चक्रण आवश्यक आहे. घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगळा केला पाहिजे. प्लास्टिक कचरा पुनर्चक्रणासाठी वेगळा जमा करणे गरजेचे आहे. अनेक शहरांमध्ये पुनर्चक्रण प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तथापि, सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्चक्रित होत नाही. त्यामुळे वापर कमी करणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो.ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिकमुक्त मोहिमा प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत. गावपातळीवर ग्रामसभा घेऊन जनजागृती करणे, बाजारपेठांमध्ये प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे आणि नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी काही साध्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात. उदाहरणार्थ, पाण्यासाठी स्वतःची बाटली वापरणे, चहा किंवा कॉफीसाठी स्टील किंवा मातीचे कप वापरणे, वाढदिवस आणि कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक सजावट टाळणे, ऑनलाईन खरेदीमध्ये अनावश्यक पॅकेजिंगला नकार देणे आणि शक्य तितक्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे. या छोट्या कृतींमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवत्व मानले गेले आहे. झाडे, नद्या, पर्वत आणि पृथ्वी यांचे पूजन करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. पूर्वीच्या काळात जीवनशैली अधिक पर्यावरणपूरक होती. पत्रावळी, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू आणि कापडी पिशव्या वापरल्या जात होत्या. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण या परंपरा विसरलो. आता पुन्हा एकदा पारंपरिक आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.आज जगभरात ‘झिरो वेस्ट’ आणि ‘सस्टेनेबल लिव्हिंग’ या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे ‘वापरा आणि फेका’ ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत.प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तरुण पिढी नवीन विचार स्वीकारण्यास अधिक तत्पर असते. महाविद्यालयीन विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. अनेक युवकांनी स्टिकमुक्त कार्यक्रम आयोजित करणे, कापडी पिशव्यांचे वितरण करणे आणि स्वच्छता अभियान राबवणे यांसारखे उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील भारत पर्यावरणपूरक बनविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्येही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर केला जातो. लग्नसमारंभ, जत्रा, उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये डिस्पोजेबल प्लेट्स, कप आणि पाण्याच्या बाटल्यांचा वापर होतो. या कार्यक्रमांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पत्रावळी, स्टीलची भांडी आणि पुनर्वापर करता येणारे साहित्य वापरण्याची चळवळ सुरू झाली आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे.पर्यटन क्षेत्रातही प्लास्टिक प्रदूषण मोठी समस्या बनली आहे. डोंगराळ भाग, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांवर प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. पर्यटनस्थळांवर प्लास्टिक नेण्यावर निर्बंध आणणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि पर्यटकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. निसर्गरम्य स्थळांचे सौंदर्य टिकवण्यासाठी प्लास्टिकमुक्त पर्यटन ही काळाची गरज आहे.शेती आणि पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे. प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शेती उत्पादनावरही परिणाम होतो. प्लास्टिक कचऱ्यामुळे पाण्याचे स्रोत दूषित होतात. ग्रामीण भागात जैविक शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीला प्रोत्साहन देऊन प्लास्टिक वापर कमी करता येऊ शकतो. शेतकरी संघटना आणि कृषी विभागांनी या संदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.आज अनेक संशोधक प्लास्टिकला पर्याय शोधण्याचे काम करत आहेत. मका, ऊस, बटाटा स्टार्च आणि समुद्री वनस्पतींपासून जैवविघटनशील पदार्थ तयार केले जात आहेत. हे पदार्थ पर्यावरणात सहज विघटित होतात. तथापि, अशा पर्यायांचा खर्च अजूनही तुलनेने अधिक आहे. सरकारने संशोधनाला प्रोत्साहन देऊन पर्यावरणपूरक उद्योगांना मदत केली पाहिजे.प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरू शकते. कापडी पिशव्या, स्टीलच्या बाटल्या आणि टिकाऊ वस्तू दीर्घकाळ वापरता येतात. त्यामुळे वारंवार नवीन वस्तू खरेदी करण्याची गरज राहत नाही. स्थानिक कारागीर आणि लघुउद्योगांनाही यामुळे रोजगार मिळू शकतो.निसर्ग आणि मानव यांचे नाते परस्परावलंबी आहे. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे शेवटी मानवाचेच नुकसान होय. पृथ्वीवरील संसाधने मर्यादित आहेत. आपण आज केलेल्या चुका भविष्यातील पिढ्यांना भोगाव्या लागू शकतात. त्यामुळे शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे.प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्य आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्था प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अनेक देश एकत्र येऊन जागतिक करार करण्याच्या दिशेने काम करत आहेत. समुद्रातील प्लास्टिक कमी करण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. तथापि, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण दैनंदिन जीवनात किती प्लास्टिक वापरतो, त्याचे पर्यावरणावर काय परिणाम होतात आणि आपण त्यात कसा बदल करू शकतो याचा विचार करण्याची ही वेळ आहे. केवळ एका दिवसापुरती जनजागृती न करता ती वर्षभर सातत्याने टिकवणे आवश्यक आहे.आजच्या काळात मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना प्लास्टिकचे दुष्परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. घरात आणि शाळेत पर्यावरणपूरक सवयी लावल्या पाहिजेत. मुलांनी स्वतः प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला तर भविष्यात समाजात मोठा बदल घडू शकतो.प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्यासाठी माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने पर्यावरण विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचवता येते. यशस्वी उपक्रमांची उदाहरणे समाजासमोर मांडल्यास इतरांनाही प्रेरणा मिळते.अनेक गावांनी आणि शहरांनी प्लास्टिकमुक्त होण्याचा आदर्श निर्माण केला आहे. काही गावांमध्ये प्लास्टिक पिशव्यांवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कापडी पिशव्यांचा वापर सुरू केला आहे. काही शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती वापरल्या जात आहेत. अशा यशस्वी प्रयोगांचा प्रसार होणे गरजेचे आहे.आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणे धोकादायक आहे. विकासाचा खरा अर्थ म्हणजे मानवाचे जीवनमान सुधारताना पर्यावरणाचे रक्षण करणे होय. जर पृथ्वीच सुरक्षित राहिली नाही तर कोणताही विकास निरर्थक ठरेल. म्हणूनच प्लास्टिकमुक्त पृथ्वी ही केवळ पर्यावरणवाद्यांची कल्पना नसून मानवाच्या अस्तित्वाशी निगडित गरज आहे.आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. ‘रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल’ या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा आपल्याला पर्यावरणाशी असलेले आपले नाते पुन्हा दृढ करण्याची प्रेरणा देतो. पृथ्वी ही आपली सामायिक संपत्ती आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे म्हणजे निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न होय.आज जर आपण सजग झालो नाही तर भविष्यातील पिढ्यांना प्रदूषित पृथ्वी वारसा म्हणून मिळेल. नद्या, समुद्र, जंगल आणि हवा यांचे संरक्षण करण्यासाठी प्लास्टिकमुक्त समाजाची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आपण पृथ्वीचे सौंदर्य आणि संतुलन जपू शकतो.या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ. कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.


**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**ईमेल — bagate.rajendra5@gmail.com**